Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *प्रादेशीक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे राजकीय अस्थिरतेला चालना*

*अतुल खोसे*

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविदयालय, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे

***सारांशः***

या संशोधन लेखाच्या माध्यमातून भारतीय राजकारणात झालेल्या विविध पातळीवरील बदलामुळे संसदीय लोकशाही प्रक्रियेवर झालेल्या परीणामांचा विचार करण्यात आला आहे. 90 च्या दशकात प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय राजकारणात सक्रिय भूमीका बजावायला सुरूवात केलेली दिसते. आता तर प्रादेशिक पक्षांच्या समर्थनावर केंद्र सरकारचे स्थैर्य अवलंबून असते अशी परिस्थीती निर्माण झालेली आहे. आता हे आजच्या राजकारणाचे प्रधान वास्तव झालेले आहे. ही स्थिती चांगली की वाईट?प्रादेशिक पक्षांमुळे संसदीय लोकशाही प्रक्रियेचा ऱ्हास झाला आहे काय?या लेखात मी प्रादेशिक पक्षाच्या उदयामुळे होणाऱ्या परीणामावर प्रकाश टाकणार आहे. प्रादेशिक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे व प्रभावामुळे राष्ट्रीय पक्षाच्या बहूमतावर परिणाम झाला आहे. केंद्रीय पातळीवर कोणत्याही एका राष्ट्रीय पक्षाला बहूमत मिळवण्यात अपयश येत आहे. यातून आघाडीच्या राजकारणाला चालना मिळाली. वेगवेगळी वैचारीक पार्श्वभूमी असलेले राजकीय पक्ष एकत्र येवून सत्ता स्थापनेसाठी निवडणूकपूर्व किंवा निवडणूकीनंतर आघाडी करतात. या राजकीय पक्षांतील वैचारीक मतभेद उघड झाल्यावर राजकीय अस्थिरता निर्माण होते. प्रादेशिक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे संसदेमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या वेगवेगळया पक्षांच्या सदस्यांचे प्रमाण वाढले यातून काही दूष्परीणाम समोर आले. यात संसदेमधील चर्चेची पातळी घसरली, अधीवेशन काळात सभागृहाच्या कामकाजाचा अपव्यय वाढला कामकाज स्थगीत होण्याचे प्रकार वाढले सभात्यागाचे प्रमाण वाढले, सभागृहाची प्रतिष्ठा धोक्यात आली. या सर्वांचा एकंदीरत परिणाम संसदीय लोकशाही प्रक्रियेवर झाला. यामुळे विधेयकासाठी कमी वेळ मिळू लागला. बरीचशी विधेयके प्रलंबीत राहू लागली. या सर्व कारणामुळे, संसदीय लोकशाही प्रक्रियेच्या होणाऱ्या ऱ्हासामुळे सामान्य जनतेचा विश्वास कमी होत चालला आहे. यातून पर्यायी शासनपध्दतीचा विचार सुरू झाला.

***महत्वपूर्ण संकल्पना :–***

प्रादेशिक पक्ष, राजकीय आघाडी, राजकीय अस्थिरता, राजकीय विचारधारा

**प्रस्तावना -**

क्रिप्स योजनेनूसार भारतात घटना समीतीची रचना करण्यात आली. भारतीय घटनेची मूलभूत चौकट तयार करयाचे मोठे आव्हान भारतीय घटनांतज्ञांसमोर होते. घटनाकरांनी लोकशाहीच्या सर्व मूल्यांचा विचार करून भारतासाठी संसदीय शासनपध्दती निवडली. ब्रिटीश काळामध्ये झालेल्या भारताच्या राजकीय विकासावर संसदीय शासनपध्दतीचा प्रभाव पडला होता. संसदीय शासनपध्दतीमध्ये कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ यांचा घनिष्ठ संबंध असतो. तसेच कार्यकारी मंडळ हे आपल्या कार्यासाठी कायदेमंडळाला जबाबदार असते. आज संसदीय लोकशाहीचा अंमलबजावणीला 60 वर्षे उलटून गेले आहेत. या काळातील यश–अपयशाचे मूल्यांकन केल्यास एक वास्तव असे समोर येते की, सामान्य जनतेचा संसदीय लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास कमी होत आहे. सामाजीक परीवर्तन करण्यात संसद अपयशी होताना दिसत आहे. यामुळे संसदीय लोकशाहीच्या औचीत्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

या संशोधन प्रक्रियेच्या माध्यमातून भारतीय राजकारणात झालेल्या विविध पातळीवरील बदलामुळे संसदीय लोकशाही प्रक्रियेवर झालेल्या परीणामांचा विचार करण्यात आला आहे. 90 च्या दशकात प्रादेशीक पक्षांनी राष्ट्रीय राजकारणात सक्रिय भूमीका बजावायला सुरूवात केलेली दिसते. आता तर प्रादेशिक पक्षांच्या समर्थनावर केंद्र सरकारचे स्थैर्य अवलंबून असते अशी परीस्थिती निर्माण झालेली आहे. आता हे आजच्या राजकारणाचे प्रधान वास्तव झालेले आहे. ही स्थिती चांगली की वाईट?प्रादेशीक पक्षांमुळे संसदीय लोकशाही प्रक्रियेचा ऱ्हास झाला आहे काय?या लेखात मी प्रादेशीक पक्षाच्या उदयामुळे होणाऱ्या परीणामावर प्रकाश टाकणार आहे. प्रादेशीक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे व प्रभावामुळे राष्ट्रीय पक्षाच्या बहूमतावर परिणाम झाला आहे. केंद्रीय पातळीवर कोणत्याही एका राष्ट्रीय पक्षाला बहूमत मिळवण्यात अपयश येत आहे. यातून आघाडीच्या राजकारणाला चालना मिळाली. वेगवेगळी वैचारीक पार्श्वभूमी असलेले राजकीय पक्ष एकत्र येवून सत्ता स्थापनेसाठी निवडणूकपूर्व किंवा निवडणूकीनंतर आघाडी करतात. या राजकीय पक्षांतील वैचारीक मतभेद उघड झाल्यावर राजकीय अस्थिरता निर्माण होते. प्रादेशीक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे संसदेमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या वेगवेगळया पक्षांच्या सदस्यांचे प्रमाण वाढले यातून काही दूष्परीणाम समोर आले यात संसदेमधील चर्चेची पातळी घसरली, अधीवेशन काळात सभागृहाच्या कामकाजाचा अपव्यय वाढला कामकाज स्थगीत होण्याचे प्रकार वाढले सभात्यागाचे प्रमाण वाढले, सभागृहाची प्रतिष्ठा धोक्यात आली. या सर्वांचा एकंदीरत परिणाम संसदीय लोकशाही प्रक्रियेवर झाला. यामुळे विधेयकासाठी कमी वेळ मिळू लागला. बरीचशी विधेयके प्रलंबीत राहू लागली. या सर्व कारणामुळे, संसदीय लोकशाही प्रक्रियेच्या होणाऱ्या ऱ्हासामुळे सामान्य जनतेचा विश्वास कमी होत चालला आहे. यातून पर्यायी शासनपध्दतीचा विचार सुरू झाला.

**Title :** *प्रादेशीक पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे राजकीय अस्थिरतेला चालना*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *अतुल खोसे* **yr:2013 vol:3 iss:2**

### *भारतीय संसद आणि प्रादेशिक पक्षांचा उदय :–*

प्रादेशिक पक्षांचा उदय, वाढ व विकास ही राष्ट्रीय पक्षाच्या अपयशाची परिणती आहे. प्रादेशिक अस्मिता, प्रादेशिक विषय, प्रादेशिक समस्यांचा आधार घेऊन राजकारणात संघटीत होणाऱ्या प्रादेशिक पक्षाबरोबरच जात, धर्म अशा मुदयांचा आधार घेणारे व विशेषतः काही प्रदेशातच सक्रिय असलेल्या राजकीय पक्षांची संख्या वाढत चालली आहे. गेल्या सहा दशकांचा विचार करता भारतीय संसदीय लोकशाहीमधील राजकीय पक्षांच्या संख्यामध्ये खूप बदल झाला आहे. स्वतंत्र भारताच्या पहिल्या सार्वत्रीक लोकसभेच्या निवडणूकामध्ये (1951) एकूण 55 राजकीय पक्ष सहभागी झाले होते. त्यांची संख्या वाढून आज 2009 मधील लोकसभेच्या निवडणूकीमध्ये 370 झाली आहे. या सर्व काळात राष्ट्रीय पक्षांची संख्या कमी होऊन प्रादेशिक पक्षांची संख्या वाढली आहे. लोकसभेमधील राजकीय पक्षांच्या 22 राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सभागृहामध्ये होते. 2009 मध्ये 37 राजकीय पक्षांचे प्रतिनिधी लोकसभेमध्ये होते. सर्वात कमी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी दूसऱ्या लोकसभेमध्ये (1957) फक्त 12 होते.

**Table 1**

**Increasing number of political parties**

| Year of Election | No of parties contesting election | No of National parties | No of parties represented in parliament |
|---|---|---|---|
| 1952 | 55 | 8 | 22 |
| 1957 | 18 | 4 | 22 |
| 1962 | 29 | 9 | 20 |
| 1967 | 25 | 8 | 19 |
| 1971 | 52 | 8 | 24 |
| 1977 | 34 | 5 | 18 |
| 1980 | 36 | 6 | 17 |
| 1984 | 38 | 7 | 21 |
| 1989 | 117 | 8 | 24 |
| 1991 | 145 | 9 | 24 |
| 1996 | 208 | 7 | 28 |
| 1998 | 176 | 7 | 39 |
| 1999 | 169 | 7 | 39 |
| 2004 | 230 | 6 | 40 |
| 2009 | 370 | 7 | 37 |

Source CSDS Data Unit

### *राजकीय पक्ष आणि मतदानाचे प्रमाण :–*

वेगवेगळया राज्यातून उदयास आलेल्या राजकीय पक्षांनी सत्ता संघर्षाचे स्वरुपच बदलले. प्रादेशिक अस्मिता जोपासणाऱ्या या राजकीय पक्षांनी प्रथम राज्याच्या विधिमंडळात जम बसवला. पण नंतर काही काळातच हे पक्ष लोकसभेमध्ये आपला प्रभाव पाडू लागले. व राष्ट्रीय राजकारणात सक्रिय झाले. उत्तरप्रदेश, तामीळनाडू सारख्या घटकराज्यात एका पेक्षा जास्त प्रादेशिक पक्ष आहेत. अशा घटक राज्यात मुख्यतः सत्ता संघर्श हा प्रादेशिक पक्षात असल्याचे दिसते. या ठिकाणी राष्ट्रीय पक्षांना तिसऱ्या किंवा चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागते. या सर्वांचा परिणाम मतांच्या विभाजनावर होत आहे. राजकीय पक्षांच्या वाढत्या संख्येमुळे राष्ट्रीय पक्षांच्या मतांच्या टक्केवारीमध्ये निश्चितच घट झाली आहे. 1984 च्या लोकसभेच्या निवडणूकीमध्ये प्रादेशीक पक्षांना मिळालेल्या एकूण मतांची टक्केवारी 11.2 : होती तर, 2009 च्या लोकसभा निवडणूकीमध्ये ही टक्केवारी 28.2 पर्यंत वाढली.

**Table 2**

**Vote share of National and Regional Parties:**

**Lok Sabha election 1984-2009**

| Parties | 1984 | 1989 | 1991 | 1996 | 1998 | 1999 | 2004 | 2009 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Congress | 48.0 | 39.5 | 36.6 | 28.8 | 25.8 | 28.3 | 26.5 | 28.6 |
| BJP | 7.4 | 11.4 | 20.1 | 20.3 | 25.6 | 23.8 | 22.2 | 18.8 |
| Left | 9.3 | 10.2 | 9.7 | 9.1 | 7.8 | 7.6 | 7.9 | 7.5 |
| BSP | 0.0 | 2.1 | 1.8 | 4.0 | 4.7 | 4.2 | 5.3 | 6.2 |
| Regional Parties | 11.2 | 27.1 | 21.1 | 26.2 | 29.3 | 29.5 | 29.3 | 28.4 |

***प्रादेशिक पक्षांची लोकप्रियता :–***

एका शोध सर्वेक्षणावरुन असे निर्दशनास आले की, प्रादेशिक पक्षांच्या लोकप्रियतेमध्ये वाढ होत आहे. राष्ट्रीय पक्षांकडून प्रादेशीक व स्थानिक स्तरांवरील प्रश्नाकडे दूर्लक्ष झाले. यामुळे राष्ट्रीय पक्षाविशयी जनतेच्या मनात विरोधी लोकमत  तयार झाले. याचाच फायदा प्रादेशिक पक्षांनी घेतला प्रादेशिक पक्षांनी स्थानिक प्रश्नांना प्राधान्य दिले. साहजीकच राष्ट्रीय पक्षापेक्षा प्रादेशिक पक्ष राज्य सरकार चांगल्या प्रकारे चालवू शकतात अशी भावना जनतेच्या मनात तयार झाली. प्रादेशिक पक्षांनी राज्याच्या राजकारणात मोठी भूमीका पार पाडावी अशी जनतेची इच्छा होती.

**Table 4**

**Increasing support for regional parties among voters**

| Opinion | 1196 | 2004 |
|---|---|---|
| Agree | 34 | 41 |
| Discharge | 20 | 31 |
| No opinion | 46 | 28 |

Source National Election Study 1996,2004 CSDS Data Unit

***राजकीय अस्थिरतेचे युग :–***

वेगवेगळया राजकीय पक्षांच्या उदयामुळे संसदेच्या कार्यकालावर याचा परीणाम झाला आहे. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये विचार स्वातंत्र्य असते. तसेच समविचारी लोकांना संगठन करता येते. निरनिराळया विचारधारेच्या पक्षांचा उदय लोकशाहीला हितकारक असतो. पण याचा एक घातक परीणाम राजकीय स्थैर्यावर होत असतो. 1990 नंतरच्या संसदेच्या कार्यकालावर प्रकाश टाकल्यास असे लक्षात येते की, संसदेचा कार्यकाल अल्पजिवी ठरला आहे. 6 व्या लोकसभेचा कार्यकाल 30 महिन्यांचा होता. 9 व्या (1989), 11 व्या (1996), 12 व्या (1998) लोकसभेला मध्यावधी निवडणूकांना सामारे जावे लागले होते. या सर्व माहितीवरुन एक गोष्ट समोर येते की, राजकीय पक्षांची संख्या वाढल्यामुळे राजकीय अस्थिरतेत भर पडली आहे.

**Table 4**

**Duration of Different house Lok Sabha 1952-2004**

| Lok Sabha | Total Months |
|---|---|
| First | 60 |
| Second | 60 |
| Third | 59 |
| Fourth | 46 |
| Fifth | 70 |
| Sixth | 30 |
| Seventh | 60 |
| Eighth | 59 |
| Ninth | 15 |
| Tenth | 59 |
| Eleventh | 18 |
| Twelfth | 13 |
| Thirteenth | 53 |
| Fourieenth | 60 |

Source Information from the website of ministry of Parliamentary affairs

एकंदरीत वरील सर्व विश्लेषणावरुन, प्रादेशिक पक्षांनी मोठया प्रयत्नपुर्वक जनतेतील असंतोश संघटीत केला व सत्ता प्राप्त केली. राष्ट्रीय पक्षांना राज्यातील आपली सत्ता संपुष्ठात येणार हे लक्षात आल्याने या पक्षाने प्रादेशिक स्तरावरील प्रश्नांची दखल घेण्यास सुरुवात केली यातूनच राज्य सरकारांना आर्थिक मदत करण्यास प्राधान्य मिळू लागले, पण या मदतीसाठी वारंवार केंद्र सरकारवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे प्रादेशिक पक्षांना केंद्र सरकारवर दबाव आणण्याची गरज जाणवू लागली. हे करणे राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्यानेच शक्य आहे असे वाटू लागले. त्यामुळेच लोकसभेच्या निवडणूका लढविण्यास हे प्रादेशिक पक्ष महत्व देऊ लागले. स्थानिक राजकारणावरील आपल्या प्रभावाचा उपयोग करुन या पक्षांनी लोकसभेत आपले उमेदवार निवडून आणले. यामुळे लोकसभेत त्रिशंकू सरकार अस्तित्वात येऊ लागली. स्वबळावर सत्ता स्थापन करणे राष्ट्रीय पक्षांना अशक्य होऊन बसले. यातून प्रादेशिक पक्षांच्या लोकसभेतील सदस्यांचा पाठिंबा मिळविणे कॉंग्रेस व भाजपा सारख्या राष्ट्रीय पक्षांना गरजेचे झाले. केंद्र सरकारचे अस्तित्व प्रादेशिक पक्षांवर अवलंबून राहू लागले. विधानसभेतील बहूमतामुळे राज्यसभेतही आपले उमेदवार निवडून आणता आले. एकूणच संसदेतील प्रादेशिक पक्षांच्या सदस्यांची उपस्थिती लक्षणीय प्रमाणात वाढली. राष्ट्रीय पक्षांच्या अपयशामुळे निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यात प्रादेशिक पक्ष अशा तऱ्हेने यशस्वी ठरले. आपल्या शिवाय राष्ट्रीय पक्षांना सरकारच स्थापन करता येत नाही एवढे आपण महत्वाचे आहोत हे प्रादेशिक पक्षाच्या लक्षात आले. राष्ट्रीय पक्षांना आपल्या मदतीसाठी किंमत मोजायला लावण्यास या प्रादेशिक पक्षांनी सुरुवात केली. केंद्र सरकारच्या निर्णय व धोरणावर प्रादेशीक पक्षांचे नियंत्रण येऊ लागले. प्रादेशिक पक्षांच्या संकूचीत दृष्टीकोनामुळे राष्ट्रीय पक्षांना निर्णय घेण्यात अडथळा येऊ लागला. च्या मुदयावर तृणमूल कॉंग्रेसने सरकारचा पाठींबा काढला. च्या मुदयावर संसदेमध्ये बहूजन समाज पार्टी च्या मयावतींचा पाठींबा घेण्याच्या मोबदल्यात सरकारी नोकरीमध्ये बढती आरक्षण विधेयक मांडले उत्तर प्रदेशमध्ये कॉंग्रेस हा समाजवादी पार्टी व बहूजन समाज पार्टी चा प्रमुख राज्याच्या राजकारणात प्रतिस्पर्धी आहे. पण, केंद्रामध्ये या दोन्ही प्रादेशिक पक्षांचा बाहेरुन पाठींबा आहे. त्याचा मोबदला म्हणून केंद्र सरकारने या दोन्ही पक्षांच्या भ्रष्ट्राचाराची चौकशी थांबवली आहे. एकंदरीत राष्ट्रीय पक्षांनी सत्तेसाठी प्रादेशिक पक्षांच्या मदतीसाठी सर्व प्रकारची आश्वासने व मदत देण्यास सुरुवात केली. प्रादेशिक पक्षांचा पाठींबा मिळविण्यासाठी त्यांना पैसा, मंत्रीपद राज्यस्तरावर दूय्यम भूमिका घेण्याची भूमिका राष्ट्रीय पक्षांनी घेतली. या सर्व सुवर्णसंधीचा पूरेपूर उपयोग प्रादेशिक पक्षांनी करुन घेतला आहे. या संशोधन पत्रीकेच्या माध्यमातून प्रादेशीक पक्षांच्या उदयामुळे व त्यांच्या राष्ट्रीय राजकारणातील सक्रिय भूमीकेमुळे निर्माण होणारी राजकीय अस्थिरता स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

*संदर्भसूची :–*

1) Kashyap, Subhash C, Coalition Government and politics in India, New Delhi, 1997
2)Khanna, S.K., Coalition Politics in India, Commonwealth Publishers, New Delhi
3)Dasarathi Bhuyan, Role of Regional Political parties in India, Mittal Publication
4)Regional Parties, Coalition Government and Functioning of Indian Parliament: The Changing pacrerns:- Research Paper by Sanjay Kumar.
5)Six decades of Parliamentary democracy Somnath Chatterjee :- The Hindu wood is Aug 2007
6) व. म. सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
7)प्रादेशिक पक्ष :– सत्तेचे राजकारण की विकासोन्मुख राजकारण?डॉत्र किशोर महाबळ



***अतुल खोसे***
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविदयालय, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net